# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रत्नागिरी **P.S.(ठाणे):** रत्नागिरी शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0418 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/11/2023 06:26

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 31/10/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यत):** 31/10/2023
**Time From (वेळेपासून):** 14:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/11/2023 **Time (वेळ):** 05:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 020
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/11/2023 05:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** केसीजैन नगर येथील, हटेल फ्लेवर्समध्ये ,रत्नागिरी

(c)**In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अभिजीत अरुण कुवळेकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण **(**राशन कार्ड **,**मतदाता कार्ड **,**पासपोर्ट**,** यूआईडी सं.**,** ड्राइविंग लाइसेंस**,** पॅन कार्ड **)**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 203,माऊलीसागर, सौभाग्य नगर नाचणे,रत्नागिरी ,रत्नागिरी ,रत्नागिरी शहर,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 203,माऊलीसागर, सौभाग्य नगर नाचणे,रत्नागिरी ,रत्नागिरी ,रत्नागिरी शहर,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (**माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता**):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शैलेश आत्माराम रेवाळे | | | 1. नेवरे ,उंबरवाडी ,रत्नागिरी , रत्नागिरी शहर,रत्नागिरी, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (**तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे**):**

9. **Particulars of properties of interest (**संबंधीत मालमत्तेचा तपशील**):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रु.दराच्या 30 भारतीय चलनी नोटा | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

15,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी अभिजीत अरुण कुवळेकर, वय-47 वर्षे, व्यवसाय-खाजगी नोकरी (मॅनेजर) रा.203 माऊलीसागर, सौभाग्य नगर नाचणे, रत्नागिरी ता. जि. रत्नागिरी मो. नं. 7721967676 समक्ष फिर्याद नोंदवुन देतो की,

मी वरील ठिकाणी वास्तव्यास आहे. मी सौ. पुजा संदीप प्रभु यांचे प्रभु ऑटोमोबाईल्स या कंपनीमध्ये मागील 22 वर्षापासुन मॅनेजर म्हणुन नोकरीस आहे. सौ. पुजा संदीप प्रभु यांचे नावे मौजे काळबादेवी ता. जि. रत्नागिरी येथे भुमापन क्रमांक उपविभाग क्रमांक 26/1 क्षेत्र 0.40.80 हा भुखंड आहे. सदरचा भुखंड मा. उपविभागीय अधिकारी रत्नागिरी यांचेकडुन आरोग्य विभागाकडुन नाहरकत दाखल घेण्याच्या अटीवर बिनशेती करुन मिळालेला आहे. सदर जागेवर हॉटेलचे बांधकाम सुरु असुन जागेशी संबंधित सर्व व्यवहार व प्रशासकीय कामकाज पाहणेबाबत सौ. पुजा प्रभु यांनी मला अधिकारपत्र दिलेले आहे. त्याप्रमाणे वर नमुद आरोग्य विभागाकडील दाखल्याच्या अनुशंगाने मी दिनांक 23/10/2023 रोजी सायंकाळी 4.30 वाजता मौजे कोतवडे ता. जि. रत्नागिरी येथील प्राथमिक आरोग्य केन्द्र कोतवडे या ठिकाणी संबंधित काम पाहणारे कर्मचारी श्री. शैलेश रेवाळे यांची भेट घेतली असता, त्यांनी संबंधित नाहरकत दाखला मिळणेकरीता अर्ज सादर करण्यास सांगुन 15,000/-रुपये रक्कमेची मागणी केलेली आहे. श्री. रेवाळे हे मागणी करीत असलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली. त्यामुळे मी दिनांक 25/10/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय रत्नागिरी येथे समक्ष हजर राहुन पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांना तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगितली व वरील हकिकतीप्रमाणे स्वःहस्तक्षरातील माझा तक्रारी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांचे समक्ष हजर केली.

मी दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 26/10/2023 रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे पोनि मुल्ला यांनी सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 26/10/2023 रोजी सकाळी 11.00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय रत्नागिरी येथे हजर होवुन पोनि मुल्ला यांची भेट घेतली. त्यावेळी पोनि मुल्ला यांनी पंच व पडताळणी पथक यांचेशी माझी ओळख करुन दिली. त्यानंतर पंचांनी माझा तक्रारी अर्ज वाचुन त्यावर तसेच त्यासोबत दिलेल्या कागदापत्रावर सहया केल्या. तसेच पोनि मुल्ला यांनी सहया केल्या. तक्रारी अर्ज व त्यासोबतचे कागदपत्र पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी ताब्यात घेतले.

मौजे काळबादेवी हे गाव प्राथमिक आरोग्य केन्द्र कोतवडे यांचे अंतर्गत येत असल्याने तेथील लोकसेवक रेवाळे हे दिनांक 26/10/2023 रोजी मौजे काळबादेवी येथील हॉटेल बांधकामाच्या ठिकाणी समक्ष भेट देवुन जागेची पाहणी करणार आहेत त्यावेळी ते लाच रक्कमेची मागणी करण्याची शक्यता आहे. तसेच नाहरकत दाखला मिळणेकरीता तयार केलेला अर्ज स्विकारणार असल्याचे मी, पोनि मुल्ला, पंच व पडताळणी पथकास सांगितले. लोकसेवक रेवाळे हे कोतवडे येथुन काळबादेवी येथे येणार असल्याने निघण्यापुर्वी मोबाईल फोनद्वारे संपर्क करणेबाबत लोकसेवक रेवाळे यांनी सांगितले असल्याचे मी पोनि मुल्ला यांना सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक रेवाळे यांना मोबाईल द्वारे संपर्क करुन मौजे काळबादेवी येथे त्यांची समक्ष भेट घेवुन पुढील पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे पोनि मुल्ला यांनी सांगितले. त्यावेळी आमचेतील होणारे संभाषण डिजीटल वॉइस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले.

पोलीस निरीक्षक मुल्ला यांनी सोनी कंपनीचा डिजीटल वॉइस रेकॉर्डरमध्ये व नवीन सीलबंद मेमरी कार्ड हजर केले. त्यांनी डिजीटल वॉइस रेकॉर्डरमध्ये मेमरी कार्ड घालुन त्यामध्ये अगोदरचे काहीही संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले नाही याबाबत पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक मुल्ला यांनी स्वतःचे, माझे व पंचांचे पडताळणीसाठी जात असल्याचे निवेदन डिजीटल वॉइस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पोलीस निरीक्षक मुल्ला यांनी मला योग्य त्या सुचना देवुन लोकसेवक रेवाळे यांचे मोबाईलवर कॉल करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझा मोबाईल नंबर 7721967676 वरून लोकसेवक रेवाळे यांना त्यांचा मोबाईल नंबर 8329187313 यावर दोन वेळा कॉल केला असता लोकसेवक रेवाळे यांचा फोन बिझी लागला. त्यानंतर लागलीच लोकसेवक रेवाळे यांचा माझे मोबाईलवर कॉल आला. त्यावेळी मी कॉल रिसीव्ह करुन मोबाईलचा स्पीकर

ऑन करुन साहेब निघालोय एक पंधरा मिनिटात पोहचतोय असे सांगितले. त्यावर लोकसेवक रेवाळे यांनी हा नंबर कोणाचा असे विचारले असता मी माझाच नंबर आहे असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक रेवाळे यांनी या..या... मी इथे दत्तमंदीरात बसलोय असे सांगितले. त्यावेळी मी चालेल ओके असे बोलुन कॉल कट केला. सदरचे संभाषण पोलीस निरीक्षक मुल्ला यांनी डिजीटल वॉइस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केलेले आहे.

लोकसेवक रेवाळे हे मौजे काळबादेवी येथे भेटणार असल्याने पंच, पोहवा कोळेकर व पोशी पवार असे आवष्यक त्या साधन सामुग्रीसह पोनि मुल्ला यांची खाजगी चारचाकी स्वीप्ट वाहन क्रमांक एचएच 08/झेड/7115 या वाहनाने तसेच मी माझे ताब्यातील ज्युपीटर दुचाकी वाहन क्रमांक एमएच 08/एपी/0646 या वाहनाने नाहरकत दाखला मिळणेबाबतच्या अर्जाच्या तीन प्रतीसह काळबादेवी येथे जाणेसाठी एसीबी कार्यालयातुन रवाना झालो. त्यानंतर आम्ही मौजे कासारवेली या ठिकाणी एका निर्जनस्थळी रस्त्याच्या कडेला थांबलो. त्यावेळी माझे तक्रारीची पडताळणी करणेकरीता मला, पंच चैघुले यांचेसह मौजे काळबादेवी येथे लोकसेवक रेवाळे यांची समक्ष भेट घेण्याकरीता पाठविण्यात येणार असल्याचे पोनि मुल्ला यांनी सांगुन इतर सुचना दिल्या.

तसेच मला व पंच चैघुले यांना लोकसेवक रेवाळे यांची भेट झाल्यानंतर मौजे कासारवेली येथील निर्जनस्थळी पडताळणी पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत येण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि मुल्ला यांनी डिजीटल वॉइस रेकॉर्डर चालू करून माझ्या शर्टच्या आत बनियनमध्ये लपविला. ती वेळ 12.36 वाजताची होती. त्यानंतर मी, पंच चैघुले यांचेसह पडताळणीकामी मौजे काळबादेवी येथे भेट घेण्याकरीता रवाना झालो. मौजे काळबादेवी येथील दत्तमंदीरासमोर लोकसेवक रेवाळे उभे होते. त्यांना मी मागोमाग येण्याबाबत खुणविले त्याप्रमाणे लोकसेवक रेवाळे त्यांचे दुचाकी वाहनाने आमचे मागोमाग आले. काही वेळाने आम्ही हॉटेल बांधकाम सुरु असलेल्या सौ. पुजा प्रभु यांच्या मालकीच्या जागेमध्ये येवुन थांबलो. त्यावेळी आमच्यात कामासंबधात बोलणे चालु होते. त्या दरम्यान मी सोबत आणलेल्या अर्ज प्रकरणाच्या तीन प्रती लोकसेवक रेवाळे यांचेकडे देवुन एका प्रतीवर रिसीव्ह देण्यास सांगितले. त्यावेळी लोकसेवक रेवाळे यांनी तीन्ही प्रती ताब्यात घेतल्या. त्यानंतर मी, लोकसेवक रेवाळे यांना हॉटेलची जागा दाखवुन सांडपाणी व्यवस्था दाखविली. त्या दरम्यान मी, त्यांना कसं काय करुया? असे विचारले असता लोकसेवक रेवाळे यांनी तुम्ही बोला.... तुम्ही काय तुमच्या हयानं देणार? कमी जास्त असेल तर सांगतो असे बोलुन हाताचे बोटाने पैशाबाबत खुणविले व असं हे नाय की, एवढेच दया तेवढेच दया असा विशय नसतो त्यामुळे तुम्हीच समजुन काय असेल ते बघा... दाखला दयायची जबाबदारी माझी असे मला सांगितले. त्यावर मी नॉर्मल काय असते तुमची प्रोसीजर मला माहीत नाय... सांगा साधारण काय.. असे विचारले त्यावर लोकसेवक रेवाळे यांनी नाय नाय.. तुम्ही आधी सांगा तुमच्या हयानी.. मी सांगतो मग कसं काय ते... असे सांगितले. त्यावर मी दहा पंधरा असे विचारले त्यावर लोकसेवक रेवाळे यांनी तुम्ही काय दयाल ते.. असे बोलले.. त्यावेळी मी, मला खरच काय कल्पना नाय... जे काय असेल तुमची प्रोसिजर ती मी फॉलो करणार त्यामध्ये काय प्रॉब्लेम नाय.. असे सांगितले असता लोकसेवक रेवाळे यांनी पंधराला आपण डन करु काय प्रॉब्लेम नाय असे बोलले. त्यावर मी ठिक आहे चालेल असे बोलुन दाखला कधी देणार याबाबत विचारले त्यावेळी लोकसेवक रेवाळे यांनी एकतीसच्या आत असे सांगितले. त्यानंतर आमचेत कामासंबंधात बोलणे चालु होते. त्या दरम्यान मी दिलेल्या अर्ज प्रकरणापैकी एका प्रतीवर रिसीव्ह देण्यास सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक रेवाळे यांनी एका प्रतीवर रिसीव्ह म्हणुन स्वाक्षरी करुन माझ्या ताब्यात दिली व झाल्यावर तुम्हाला फोन करतो असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक रेवाळे त्यांचे ताब्यातील वाहनाने सदर ठिकाणाहुन निघुन गेले. त्यानंतर मी व पंच चैघुले असे मोटारसायकलने पडताळणी पथक थांबुन असलेल्या मौजे कासारवेली येथील निर्जनस्थळी परत आलो. त्यावेळी पोनि मुल्ला यांनी माझेकडील डिजीटल वॉइस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. ती वेळ 13.01 वाजताची होती. पोनि मुल्ला यांनी मला घडलेली हकीकत विचारली असता मी त्यांना वरीलप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि मुल्ला यांनी खाजगी वाहनात डिजीटल वॉइस रेकॉर्डर चालू करुन, स्पिकर ऑन केला. त्यावेळी मी, पंच, पोनि मुल्ला व पडताळणी पथकाने त्यातील संभाषण ऐकले. त्यावेळी मी माझा व लोकसेवक रेवाळे यांचा आवाज ओळखला.

सौ. पुजा प्रभू यांचे मालकीची मौजे काळबादेवी येथील भुमापन व उपविभाग क्रमांक 26/1 क्षेत्र 0.40.80 अषी बिनषेती जमीन असुन जागेमध्ये हॉटेलचे बांधकाम सुरु आहे. सदर हॉटेल बांधकामाकरीता आवश्यक असणारा आरोग्य विभागाकडील नाहरकत दाखला मिळणेकरीता मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिशद रत्नागिरी यांचे नावे मा. वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र कोतवडे ता. जि. रत्नागिरी यांचे मार्फतीने सादर करायचा अर्ज स्विकारण्यासाठी तसेच त्याबाबतचे कामकाज पुर्ण करुन नाहरकत दाखला देण्याकरीता लोकसेवक रेवाळे यांनी माझेकडे 15,000/-रुपये लाच रक्कमेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे, तसेच दाखला तयार झाल्यानंतर मला फोनद्वारे कळविणार असल्याचे समक्ष भेटी दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये आढळुन आले. त्यामुळे सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करुन पुढील सापळा कारवाई लोकसेवक रेवाळे यांनी माझ्याशी संपर्क

केल्यानंतर त्याप्रमाणे करण्यात येणार असल्याचे पोनि मुल्ला यांनी सांगितले.

पोनि मुल्ला यांनी मला, पंचांना व पडताळणी पथकातील सदस्यांना सदर घटनेबाबत गोपनीयता राखणेबाबत सूचना दिल्या. गोपनियतेच्या कारणास्तव पडताळणी कारवाईचा पंचनामा व संभाशणाची ट्रान्सस्क्रिप्ट एसीबी कार्यालय रत्नागिरी येथे करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि मुल्ला, पंच, पडताळणी पथक खाजगी वाहनाने व मी माझे ताब्यातील दुचाकी वाहनाने कासारवेली येथुन निघुन एसीबी कार्यालय रत्नागिरी येथे आलो. लोकसेवक रेवाळे यांनी रिसिव्ह करुन दिलेल्या अर्ज प्रकरणाची छायांकीत प्रत घेवुन ती प्रकरणी सामील करणार असल्याचे पोनि मुल्ला यांनी सांगुन सदर अर्ज प्रकरणाची छायांकीत प्रत घेतली. सदर प्रतीवर पोनि मुल्ला व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर मी तेथुन निघुन गेलो.

पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक रेवाळे यांनी नाहरकत दाखला मिळणेबाबतचे अर्ज प्रकरण माझेकडुन स्विकारले असुन, दाखला तयार झाल्यानंतर मोबाईल फोनद्वारे संपर्क करणार असल्याबाबत दिनांक 26/10/2023 रोजीच्या पडताळणी कारवाई वेळीच्या संभाषणामध्ये आढळुन आले होते. त्याप्रमाणे दिनांक 30/10/2023 रोजी लोकसेवक रेवाळे यांचेशी माझा मोबाईलवर संपर्क झाला असता लोकसेवक रेवाळे यांनी नाहरकत दाखला तयार झालेबाबत सांगितले व दिनांक 31/10/2023 रोजी लोकसेवक रेवाळे हे रत्नागिरी येथे येणार असुन त्यावेळी ते माझी भेट घेवुन नाहरकत दाखला देणार असुन त्यावेळी ते लाच रक्कम स्विकारण्याची शक्यता आहे. असे मी पंचांना, पोनि मुल्ला व सापळा पथक यांना सांगितले. त्यानुसार दिनांक 31/10/2023 रोजी मी लोकसेवक रेवाळे यांचेशी मोबाईलद्वारे संपर्क केल्यानंतर भेटीचे ठिकाण निश्चित होईल त्यानंतर पुढील सापळा कारवाई करण्यात येणार आहे. असे पोलीस निरीक्षक मुल्ला यांनी सांगितले.

पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांचे सुचनेवरुन मी लाचेची रक्कम रुपये 15,000/- (रुपये पंधरा हजार) (500/- रुपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा) हजर केली. पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांच्या सुचनेवरून पंच नं. 1 चैघुले यांनी माझी अंगझडती घेतली. माझे अंगझडतीत मिळुन आलेल्या चीजवस्तु व रोख रक्कम मला परत करण्यात आल्या.पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी एसीबी कार्यालयात मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट दिवा व अँन्थ्रासीन पावडर दाखवून त्याचे उपयोग व गुणधर्म समजावून सांगितले. अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या वस्तूवर अंधारामध्ये अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या वस्तूवर अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून येते. नेहमीच्या प्रकाशात तशी चकाकी दिसून येत नाही असा गुणधर्म असल्याचे सांगितले. मी हजर केलेली लाचेची रक्कम प्रथम नेहमीच्या उजेडात व नंतर एसीबी कार्यालयात दारे खिडक्या बंद करुन अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात दाखविल्या त्या नोटा नेहमी सारख्याच दिसल्या.

पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांच्या सूचनेवरून पोलीस हवालदार कोळेकर यांनी लाचेची रक्कम एका कागदावर ठेवून नोटांच्या दोन्ही बाजूस हाताच्या बोटाने अँन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर त्यांचे हात व त्या नोटा नेहमीच्या प्रकाशात दाखविल्या असता नोटांवर अगर त्यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर अँन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर एसीबी कार्यालयामध्ये दारे खिडक्या बंद करुन अंधार करून पोलीस हवालदार कोळेकर यांच्या हातामधील लाच रक्कमेवर पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या नोटांवर दोन्ही बाजूस अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. तशीच चकाकी पोलीस हवालदार कोळेकर यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर दिसून आली. त्यानंतर उजेड करण्यात आला. पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांच्या सूचनेवरून पोलीस हवालदार कोळेकर यांनी त्या नोटांची घडी करुन माझ्या षर्टच्या डाव्या बाजुच्या खिषात ठेवली. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी मला सूचना दिली की, लोकसेवक रेवाळे यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी करेपर्यंत व लाच रक्कम देण्याची वेळ येत नाही तो पर्यंत मी सदर नोटांना हात लावू नये असे सांगितले.

तसेच मी लोकसेवक रेवाळे यांना लाच रक्कम देण्यासाठी भेट घेईन त्यावेळी आमचेतील होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी स्वतःचे, माझे व पंचांचे निवेदन डिजीटल वॉइस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केलेले . लोकसेवक रेवाळे हे कोतवडे येथुन दुपारी 1.00 वाजण्याच्या सुमारास निघणार असुन निघण्यापुर्वी ते मला मोबाईल द्वारे संपर्क करणार असल्याचे सांगितले होते. बराच वेळ होवुन देखील लोकसेवक रेवाळे यांनी मला कॉल न केल्याने मी लोकसेवक रेवाळे यांना कॉल करुन ते रत्नागिरी येथे कधी येणार आहेत? याबाबत विचारणा करतो असे पोनि मुल्ला यांना सांगितले. त्यावेळी आमचेतील मोबाईल फोनवरील संभाषण डिजीटल वॉइस रेकॉर्डरद्वारे मेमरीकार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत करणात येणार असल्याचे पोनि मुल्ला यांनी सांगुन मोबाईलवर कॉल करण्यापुर्वी सुचना दिल्या.

मी माझे मोबाईल नंबर 9511276696 वरून लोकसेवक रेवाळे यांचा मोबाईल नंबर 8975652183 यावर कॉल करुन स्पीकर ऑन केला. त्यावेळी लोकसेवक रेवाळे यांनी फोन रिसीव्ह न केल्याने मी फोन कट केला.

त्यानंतर काही वेळाने लोकसेवक रेवाळे यांचा मोबाईल नंबर 8975652183 यावरुन माझे मोबाईल नंबर 9511276696 यावर कॉल आला. त्यावेळी मी लोकसेवक रेवाळे यांना रत्नागिरीत आलात का... असे विचारल्यानंतर फोन कट झाला. त्यानंतर लागलीच मी लोकसेवक रेवाळे यांना कॉल करुन रत्नागिरीत आलात काय... असे विचारले असता लोकसेवक रेवाळे यांनी कोतवडयातुन निघत असल्याचे सांगुन दोन वाजेपर्यंत पोहचतो असे सांगितले. त्यावेळी मी कुठे भेटुया असे विचारले असता लोकसेवक रेवाळे यांनी मिथीला मध्ये असे सांगितले. त्यावेळी मी, मिथीला मध्ये गर्दी असते त्यामुळे के.सी.जैन नगर येथे फ्लेवर्स हॉटेलमध्ये भेटु... असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक रेवाळे यांनी ठिक आहे असे सांगुन फोन कट केला.

त्यानंतर काही वेळाने लोकसेवक रेवाळे यांचा मोबाईल नंबर 8975652183 यावरुन माझा मोबाईल नंबर 9511276696 यावर कॉल आला परंतु कॉल रिसीव्ह करेपर्यंत कॉल कट झाला. त्यानंतर लागलीच मी लोकसेवक रेवाळे यांना कॉल केला त्यावेळी लोकसेवक रेवाळे यांनी ते मिथीलाच्या समोर आले असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना दहा मिनिटात येतो फ्लेवर्सला थांबा असे सांगुन फ्लेवर्स हॉटेलचा पत्ता सांगितला. त्यावेळी लोकसेवक रेवाळे यांनी ओके ठिक आहे असे बोलुन फोन कट केला. त्यानंतर पोनि मुल्ला यांनी सापळा कारवाईच्या अनुशंगाने सुचना दिल्या. त्यानंतर पोनि मुल्ला यांनी डिजीटल वॉइस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आत बनियन मध्ये लपविला. ती वेळ 14.24 वाजताची होती. त्यानंतर मी व पंच चैघुले असे माझे ताब्यातील मोटार सायकल क्रमांक एमएच/08/एपी/0646 या दुचाकी वाहनाने लोकसेवक रेवाळे यांची भेट घेण्यासाठी लाचलचुपत प्रतिबंधक कार्यालय रत्नागिरी येथुन के.सी.जैन नगर येथील हॉटेल फ्लेवर्स येथे जाण्यासाठी रवाना झालो. मी के. सी.जैन नगर येथील हॉटेल फ्लेवर्सच्या जवळ दुचाकी पार्क केली. त्यावेळी सापळा पथक व पंच देसाई हॉटेल फ्लेवर्सच्या आजुबाजुला व समोरील रस्त्यावर कोणालाही संशय येणार नाही अशा रीतीने थांबुन होते. त्यानंतर मी हॉटेल फ्लेवर्समध्ये गेलो. त्यावेळी पंच चैघुले हॉटेलच्या बाहेर थांबुन होते. मी हॉटेलमध्ये गेलो त्यावेळी लोकसेवक रेवाळे हॉटेलमध्ये टेबलसमोरील एका खुर्ची मध्ये बसलेले होते. त्यावेळी मी त्यांचे समोर असणाऱ्या खुर्चीमध्ये जावुन बसलो. त्यावेळी आमचेत कामासंबधात बोलणे चालु होते. त्या दरम्यान लोकसेवक रेवाळे यांनी सोबत आणलेला नाहरकत दाखला माझेकडे दिला व चेक करुन घेण्यास सांगितले.त्याप्रमाणे मी दाखला ताब्यात घेवुन सही वगैरे काय आहे का असे विचारले त्यावेळी लोकसेवक रेवाळे यांनी मी मारली सही असे मला सांगितले. आमचेत कामासंबधात बोलणे चालु असताना पंच चैघुले हे पोलीस नाईक आंबेकर यांचेसह हॉटेलमध्ये येवुन आमचे जवळच्या टेबला समोरील खुर्चामध्ये बसले. त्यानंतर लोकसेवक रेवाळे यांनी जी पे किंवा फोन पे ची व्यवस्था आहे का असे विचारले त्यावर मी नाही कॅशने देतो असे त्यांना सांगितले असता लोकसेवक रेवाळे हे ओके असे बोलले. त्यानंतर लोकसेवक रेवाळे यांनी निघुया का असे विचारुन हाताच्या बोटाने पैशाबाबत खुणावले त्यावेळी मी माझे शर्टच्या डाव्या खिशातील लाच रक्कम उजव्या हाताने काढुन लोकसेवक रेवाळे यांचे समोर धरली व ठरल्याप्रमाणे पंधरा हजार आहेत.... मोजुन घ्या असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक रेवाळे यांनी बरं असे म्हणुन लाच रक्कम आपल्या उजव्या हाताने स्विकारुन शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर लोकसेवक रेवाळे यांनी ज्याम भिती वाटले हल्ली.... म्हणुन पहीलं तुम्हाला आल्यावर बोललो की, जी पे किंवा फोन पे वगैरे आहे का? असे मला सांगितले. त्यावर मी एवढी अमाऊंटच नसते माझ्या खात्यात.... असे सांगितले. त्यानंतर मी येवु का असे विचारुन हॉटेलच्या बाहेर आलो व सापळा पथकास लोकसेवक रेवाळे यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा म्हणुन माझा चष्मा डाव्या हाताने काढला. त्यावेळी लोकसेवक रेवाळे हे देखील माझे मागोमाग हॉटेलच्या बाहेर आले.

त्यावेळी पोनि मुल्ला यांनी एका बाजुला जावुन माझेकडील डिजीटल वॉइस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद करून तो स्वतःचे ताब्यात ठेवला. ती वेळ 14.45 वाजताची होती. त्यानंतर पोनि मुल्ला यांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, मी हॉटेल फ्लेवर्सच्या बाहेर उभे असलेल्या लोकसेवक रेवाळे यांचेकडुन अंगुली निर्देश केला व मी हॉटेलमध्ये लाच रक्कम 15,000/-रूपये माझे शर्टच्या डाव्या खिषातुन उजव्या हाताने काढून लोकसेवक रेवाळे यांचेसमोर धरली असता त्यांनी ती रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून ती लाच रक्कम त्यांचे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली असे सांगितले. लागलीच पोनि मुल्ला यांनी लोकसेवक रेवाळे यांचा उजवा हात व पोनि मुल्ला यांचे सुचनेनुसार पोना आंबेकर यांनी डावा हात पकडुन त्यांना अटकावुन ठेवले. त्यानंतर पोनि मुल्ला यांनी मला हात कशासही लागणार नाही अशा स्थितीत एका बाजुला थांबण्यास सांगितले त्याप्रमाणे मी जावून थांबलो.

त्यानंतर काही वेळाने पोनि मुल्ला यांनी मला खाजगी वाहनात बोलाविले. खाजगी वाहनात काळ्या रंगाच्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करुन माझे हातांची व शर्टच्या डाव्या खिशाची अल्ट्राव्हायोलेट दिव्याखाली तपासणी केली असता माझे उजव्या हाताच्या अंगठयासह सर्व बोटांचे पेरांना व शर्टच्या डाव्या बाजुचे खिशाचे वरील कडेला व आतील बाजुस अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. पंच चैघुले

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): shailesh dattatray sa

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

पोलीस ठाणे अमलदार
रत्नागिरी शहर पोलीस ठाणे
ता. जि. रत्नागिरी, राज्य महाराष्ट्र
फोन - ( ०२३५२ ) २२२३३३